# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-२८४७/२०२२

**अपिलार्थी, श्रीम.अमिता अशोक घरत,**
**२६/३, प्लॅट नं.१, माया निवास, पास्थळ नाका,**
**ता.जि.पालघर ४०१ ५०४.**

विरुध्द

जन माहिती अधिकारी, बांधकाम उपविभाग,
जिल्हा परिषद पालघर यांचे कार्यालय,
पालघर बोईसर रोड, कोळगांव,
पालघर, ता.जि.पालघर ४०१ ४०४.

प्रथम अपीलीय प्राधिकारी, बांधकाम उपविभाग,
जिल्हा परिषद पालघर यांचे कार्यालय,
पालघर बोईसर रोड, कोळगांव,
पालघर, ता.जि.पालघर ४०१ ४०४.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक** : १२.३.२०२६

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १४.६.२०२२ | ---- | २.८.२०२२ | ----- |

अपिलार्थी यांनी दि.२८.९.२०२२ रोजीच्या अर्जान्वये "माहिती प्राप्त झाली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १२.३.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थीचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. तथापि, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(मौजे पास्थळ येथील सर्व्हे नं.२६/३ पै.क्षेत्रात चालू असलेले अनधिकृत बांधकामास स्थगिती मिळणेकामी या विषयासंबंधात दि.१३.०४.२०२२ रोजी अर्ज केला होता. तथापि, माझ्या अर्जावर आजपर्यंत कोणतीही समाधानकारक कारवाई करण्यात आलेली नाही. कृपया त्यासंबंधात माहिती द्यावी.)"*

*"(१. माझ्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा दैनिक प्रगती अहवाल. २. या कालावधीत माझा अर्ज त्या अधिकाऱ्याकडे पडून होता. त्या सर्व अधिकाऱ्यांची नावे व पदनामे आणि त्या कालावधीत या अधिकाऱ्यांनी माझ्या अर्जावर केलेली कारवाई. ३. या प्रत्येक अधिका-याच्या कार्यालयातील माझ्या अर्जाच्या प्राप्तीचा व ती निर्गमित केल्याचा पुरावा. ४. तुमच्या विभागाच्या कार्यालयीन कार्यपध्दतीनुसार, नागरी सनदेच्या किंवा शासकीय कर्तव्ये करण्यास दिरंगाई संबंधीच्या कायद्यानुसार किंवा अन्य कोणत्याही आदेशाच्या नियम व विनियमानुसार अशा प्रकरणावर ज्या कालावधीत /दिवसांत कार्यवाही केली जाते किंवा ती प्रकरणे सोडविली जातात तो कालावधी/ते दिवस व कृपया या नियमाची कायदेशीर तरतुदीची प्रत दया.५. ज्या अधिका-यांनी या नियमांमध्ये नमूद केलेल्या कालमर्यादेचे पालन केलेले नाही असे अधिकारी या नियमाचा भंग केल्याबद्दल दोषी असल्याने, वरील नियमांचे उल्लंघन करणा-या अधिका-याविरूध्द नियमानुसार करण्याच्या प्रस्तावित असलेल्या कारवाईची माहिती दया. ६. कसूर करणा-या अधिका-यांविरूध्द/कर्मचा-यांविरूध्द केलेल्या कारवाई अहवालाची प्रत.)"*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

या प्रकरणी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. त्याचप्रमाणे तत्कालीन प्रथम अपिलिय अधिकारी यांनीही त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही व कोणतेही आदेश पारित केले नाहीत.

जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलिय अधिकारी हे त्यांना सुनावणीची नोटीस प्राप्त होऊनदेखील ते अनुपस्थित असल्याने या संदर्भात त्यांचे म्हणणे जाणून घेता आले नाही. सबब, अपिलार्थी यांना माहिती मिळण्यास झालेल्या विलंबाबद्दल विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी पुढील सुनावणीस आयागोकडे स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. त्याचप्रमाणे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसांत शीघ्र टपालाने विनामूल्य पुरविणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

१. **विद्यमान जन माहिती अधिकारी, बांधकाम उपविभाग, जिल्हा परिषद पालघर यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसात शीघ्र टपालाने नि:शुल्क पुरवावी. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.**

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, बांधकाम उपविभाग, जिल्हा परिषद पालघर यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक १४.६.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु. २५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये, **याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे दि.२१.४.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, प्रस्तुत प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

३. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२१.४.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १२ मार्च, २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन जन माहिती अधिकारी, बांधकाम उपविभाग,
जिल्हा परिषद पालघर यांचे कार्यालय,
पालघर बोईसर रोड, कोळगांव,
पालघर, ता.जि.पालघर ४०१ ४०४
<u>-यांना प्रत</u> विद्यमान जन माहिती अधिकारी, बांधकाम उपविभाग,
जिल्हा परिषद पालघर यांचे कार्यालय,
पालघर बोईसर रोड, कोळगांव,
पालघर, ता.जि.पालघर ४०१ ४०४ <u>यांचेमार्फत रवाना.</u>

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ

**अपिल क्रमांक : के.आर-२८४७/२०२२**
**अपिलार्थी, श्रीम.अमिता अशोक घरत,**
**सुनावणी दिनांक २१.४.२०२६** (In continuation of order dt.१२.३.२०२६)

<u>विवेचन</u>

सदर सुनावणीस अपिलार्थींचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. तथापि, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

या प्रकरणी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपावेतो माहिती प्राप्त झालेली नाही. आयोगाने दि.१२.३.२०२६ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसांत विनामूल्य माहिती पुरविण्याचे आदेश दिले होते. तथापि, त्यानंतरदेखील उपलब्ध माहिती अपिलार्थींना देण्यात आलेली नाही. अपिलार्थी यांना माहिती न पुरविणे याचे कारण जाणून घेण्यासाठी विद्यमान जन माहिती अधिकारी यांची उपस्थिती आयोगास आवश्यक आहे. सबब, विद्यमान जन माहिती अधिकारी यांना सिव्हील प्रोसिजर कोड नुसार समन्स काढण्यात यावे. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचा खुलासादेखील आयोगाच्या दि.१२.३.२०२६ रोजीच्या आदेशाद्वारे मागविण्यात आला होता. तथापि, त्यांनीही असा कोणताही खुलासा आजरोजी आयोगास सादर केलेला नाही. सबब, त्यांना खुलासा सादर करण्यासाठी अधिकची संधी देण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२६.५.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.**

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २१ एप्रिल, २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन जन माहिती अधिकारी, बांधकाम उपविभाग,
जिल्हा परिषद पालघर यांचे कार्यालय,
पालघर बोईसर रोड, कोळगांव,
पालघर, ता.जि.पालघर ४०१ ४०४

**-यांना प्रत** विद्यमान जन माहिती अधिकारी, बांधकाम उपविभाग,
जिल्हा परिषद पालघर यांचे कार्यालय,
पालघर बोईसर रोड, कोळगांव,
पालघर, ता.जि.पालघर ४०१ ४०४ **यांचेमार्फत रवाना.**

**(विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना सदरची नोटीस न बजाविल्यास त्यांना जबाबदार धरण्यात येईल).**

राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ